# स्त्रीमुक्ती : चिंता व चिंतन


डॉ. अशोक कृष्णाजी जोशी

स्त्रीत्वाची संकल्पना मांडीत असताना, स्त्रीमुक्ती चळवळीचा नेमका अर्थ स्पष्ट करीत असताना सिमॉन द् बोव्हार ही प्रसिद्ध फ्रेंच लेखिका, तसेच जगप्रसिद्ध लेखक व तत्वज्ञ सार्त्र यांची सखी म्हणते, "कोणतीही स्त्री स्त्री म्हणून जन्माला येत नाही, जगण्याच्या प्रक्रियेतच तिला स्त्रीत्व लाभत असते. समाज तिच्यावर स्त्रीत्व लादीत असतो. पुरुष व नपुंसक यामधील 'स्त्री' हा जीवाची निर्मिती सारी संस्कृती करीत असते. समाज व त्या समाजातील शिक्षक स्त्रीत्वाचे प्रमुख वैशिष्ट्य मानली गेलेली निष्क्रियता स्त्रीत्वाचा आदर्श आहे अशी भूमिका स्त्रीवर लादीत असतात. दुसऱ्यांना सुखी करण्यातच आपले सुख सामावलेले आहे म्हणून एखाद्या वस्तूसारखे आपण आयुष्य जगावे असे तिला शिकवण्यात येते. स्वतःची स्वायत्तता विसरण्याचा मार्ग तिला सुचवला जातो. परंतु तिची स्वायत्तता जतन करण्यासाठी, वृद्धिंगत करण्यासाठी जर तिला प्रोत्साहित केले तर स्त्रीमधील जीवनाविषयी तितकाच उत्साह, उत्सुकता, उपक्रमशीलता, कणखरपणा व कष्ट करण्याची वृत्ती दाखवील." [द सेकंड सेक्स, 1949]

सिमॉन द् बोव्हारचा वरील उतारा स्त्रीत्वाच्या प्राणिशास्त्रीय व्याख्येला आव्हान देत नसून समाजात अस्तित्वात असलेली स्त्रीत्वाची कल्पना कशी घडली आहे हे सांगून त्या सामाजिक कल्पनेला आव्हान देत आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या परिच्छेदातील महत्वाचा मुद्दा हा की स्त्रीत्वाची सामाजिक कल्पना जन्मदत्त नसून समाजनिर्मित घटित आहे. ती एक सामाजिक घटनाच आहे. याचाच अर्थ हा की वेगवेगळ्या अवस्थेतील समाजांनी स्त्रीच्या सामाजिक स्थानाविषयी आपल्या मूल्यव्यवस्थेनुरूप काही सामाजिक संकेत निर्माण केलेले असतात व त्या संकेतांना धरून त्या समाजाने स्त्रीत्वाची आपली अशी प्रतिमा निर्माण केलेली असते. समाजातील स्त्रीत्वाच्या कल्पनेचा व आनुवंशिकी आणि प्राणिशास्त्रीय सत्यांचा काही संबंध नसतो. म्हणजेच एखाद्या समाजातील स्त्रीच्या उच्च व नीच दर्जाबद्दल त्या समाजाच्या मूल्यव्यवस्थेलाच जबाबदार धरणे योग्य होईल.

वरील उताऱ्यातून दुसरा मुद्दा हा निर्माण होतो की ज्यांना स्त्रीच्या समाजातील दुय्यम स्थानाविषयी विषाद वा खेद वाटतो त्यांनी त्या समाजातील मूल्यव्यवस्थेला आव्हान देऊन बंड करणे आवश्यक आहे. अशी बंडखोरी करूनच त्या समाजातील स्त्रीमुक्ती चळवळ आकार घेऊ शकेल.

हा उतारा आणखी एक मुद्दा सूचित करतो. काही जन्मदत्त आनुवंशिकी वा प्राणिशास्त्रीय वैशिष्ट्यांमुळे वा वेगळेपणामुळे



दुय्यम दर्जाचे 'जीव' म्हणून जन्माला आलो आहोत हा भ्रम स्त्रियांनी सोडून देऊन आत्मविश्वासाने समाजातील आपले स्थान सिद्ध केले पाहिजे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील स्त्रीमुक्ती चळवळ सिमॉन द् बोव्हारच्या या वैचारिक भूमिकेवर आधारली आहे हे स्पष्ट आहे. पण या विचाराला सार्वत्रिकतेचेही परिमाण आहे हे विसरून चालणार नाही. म्हणूनच भारतीय संदर्भातही हा विचार अत्यंत समर्पक आहे.

सिमॉन द् बोव्हारचा स्त्रीविषयक विचार कसा पायाभूत स्वरूपाचा आहे हे आपण पाहिले. आता स्त्रीमुक्तीसंबंधीच्या तीन प्रमुख दृष्टिकोणांचा विचार करू.

पहिला दृष्टिकोण असे मांडतो की स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रीची सर्व प्रकारच्या अन्यायापासून मुक्तता व स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार. हा विचार एकोणीसाव्या शतकात पाश्चिमात्य देशात तसेच भारतातही प्रभावी ठरला होता. उदारमतवाद व मानवतावाद हा त्याचा पाया होता व लोकशाहीचे तत्वज्ञान त्याचे मुख्य तत्वज्ञान होते. जॉन स्टुअर्ट मिल व फ्रेंच राज्य-क्रांतीतील रूसोसारख्या तत्वज्ञांनी मांडलेले विचार या दृष्टिकोणाच्या मुळाशी होते.

स्त्रीमुक्तीच्या प्रश्नाकडे वैशिष्टयपूर्णरीतीने पहाण्याचा मार्क्सवादी दृष्टिकोणही अस्तित्वात आहे. स्वतः मार्क्सने यासंदर्भात काहीही मार्गदर्शन केलेले नसले तरी एंगल्सने या प्रश्नाचा विचार करून स्त्रियांच्या प्रश्नांचा संबंध आर्थिक सामाजिक घटकांशी व श्रमविभागणीच्या तत्वाशी जोडला होता. मानवाला शोषणमुक्त करणारी समाजवादी क्रांतीच स्त्रियांचे प्रश्न सोडवू शकेल व स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करील असा विश्वास मार्क्सवादी विचारवंत बाळगतात. सोविएट रशिया व चीन या दोन प्रमुख कम्युनिस्ट देशातही स्त्री-पुरुष समानतेवर विशेष भर देण्यात येतो. या दृष्टिकोणात स्त्रियांचे प्रश्न एकूण मानवी प्रश्नांशी, विशेषतः तत्कालीन सामाजिक-आर्थिक परिस्थितीशी, उत्पादनसाधनांच्या मालकीशी, उत्पादनसंबंधाशी निगडीत आहेत असे मानण्यात येते व स्त्रीमुक्ती चळवळीने पुरुष विरोधी पवित्रा घेणे अयोग्य आहे असे मानण्यात येते.

तिसरा दृष्टिकोण गेल्या काही दशकात उदयास आला असून त्यामध्ये स्त्रियांच्या दुरवस्थेस पुरुषांना जबाबदार धरण्यात येते व स्त्रीमुक्ती चळवळीला पुरुषविरोधी चळवळीचे स्वरूप देण्यात येते. युरोप-अमेरिकेत तसेच भारतातही उच्चभ्रू थरातील स्त्रीमुक्ती कार्यकर्त्यांमध्ये हा विचार विशेष प्रभावी ठरला आहे.

हे तीन दृष्टिकोण महत्वाच्या बाबतीत वेगवेगळी भूमिका मांडीत असले तरी स्त्रियांना न्याय व समानता मिळवून देणे, त्यांच्या वैयक्तिक आकांक्षा पु-या करून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची सामाजिक संधी त्यांना मिळवून देणे या गोष्टींना प्राधान्य देतात हे नमूद केले पाहिजे. याचबरोबर त्यांच्या भूमिकातील विभिन्न दृष्टीचीही नोंद केली पाहिजे. उदारमतवादी मत मन वळवणे, सामाजिक शिक्षण यासारख्या लोकशाहीवादी साधनांवर विश्वास ठेवते. समाजवादी दृष्टिकोण क्रांतिकारी कृतीवर भर देतो व स्त्रीमुक्तीचळवळीचा संबंध श्रमिकांच्या क्रांतिकारी कृतीशी जोडतो, मानवमुक्तीचे उद्दिष्ट ठेवणा-या समाजवादी क्रांतीचा स्त्रीमुक्ती चळवळ हा एक भाग आहे असे मानतो. स्त्रीमुक्तीविषयी बंडखोर विचार-धारेचा पुरस्कार करणारा तिसरा दृष्टिकोण स्त्रीचे अलगपण आग्रहाने पुरस्कारतो व त्यामुळेच स्त्रीमुक्ती चळवळीने आपले वैशिष्टयपूर्ण रूप सिद्ध करावे असा आग्रह धरतो.

: 2 :

स्त्रीमुक्तीचळवळीकडे पहाण्याच्या या तीन प्रमुख दृष्टि-कोनांतील साम्यभेदांचा विचार केल्यावर स्त्रीमुक्तीचळवळीच्या इतिहासाकडे पहाणे युक्त होईल.

मानवी इतिहासातील मातृसत्ताक समाज वगळता सर्व पितृसत्ताक समाजव्यवस्था असलेल्या समाजांमध्ये स्त्रियांना पुरुषांबरोबरचे स्थान दिलेले दिसत नाही, त्यांचे सामाजिक स्थान दुय्यम दर्जाचे मानले गेलेले आढळते. परंतु असे करण्याची कारणे मात्र वेगवेगळी दिलेली आढळतात. मध्ययुगीन युरोप, तसेच मध्ययुगीन भारतातही पुरुषांच्या नैतिक व आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गात स्त्री अडथळा आणते म्हणून तिला दुय्यम दर्जाचे स्थान दिले गेले. या काळातील ज्यू व ख्रिश्चन धर्मही हीच विचारसरणी मान्य करीत होते व स्त्रीला अशुद्ध तसेच पापाला उद्युक्त करणारा जीव मानीत होते. हिंदू धर्म स्त्रीला एका बाजूने देवता मानीत होता, तर दुस-या बाजूने मोक्षमार्गातली अडचण मानीत होता. प्रथम पिता, त्यानंतर पती व नंतर पुत्र या तीन पुरुष सत्ताकेंद्राच्या सत्तेखाली व हुकुमात स्त्रीला रहावे लागणे स्वाभाविक मानले जात होते.

स्त्री ही समाजाचा एक स्वायत्त घटक असून पुरुषांप्रमाणे तीही सर्व प्रकारच्या मानवी हक्कांची भागिदार असली पाहिजे ही विचारसरणी मात्र स्पष्टपणे एकोणीसाव्या शतकात युरोपमध्ये उदयास आली. फ्रेंच राज्यक्रांती काळात उदयास आलेल्या तत्वज्ञानाने यासाठी योग्य मनोभूमिका तयार केली होती. मार्क्सच्या क्रांतिकारी तत्वज्ञानाने शोषणमुक्त मानवी समाजातील मुक्त मानवाचा आदर्श समोर ठेवून श्रमिकांच्या क्रांती द्वारे स्वातंत्र्य व समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्याचा मार्ग सुचवला व श्रमिकांबरोबरच स्त्रीमुक्तीचा विचारही अधिक समर्थपणे पुढे येऊ शकला. शोषित वर्ग हा नशिबाने, पूर्वकर्माने वा आपल्या दुर्दैवाने शोषितावस्थेत राहिला नसून अन्यायूय

अशा विषमतावादी समाजव्यवस्थेतच शोषितांच्या शोषणाची कारणे आहेत हे मार्क्सच्या आर्थिक विश्लेषणाने स्पष्ट झाले. त्याचबरोबर स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान, तिच्यावर होणारा अन्याय यांना पुरुषप्रधान समाजव्यवस्थाच जबाबदार आहे हेही एकोणीसाव्या शतकात ठामपणे मांडले गेले.

याचकाळी युरोपात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरुवात झाली. अठराशे चाळीस ते अठराशे ऐंशी हा कालखंड स्त्रीमुक्तीचळवळीचा युरोपातील पहिला कालखंड मानण्यात येतो. जॉर्ज एलिअट, एलिझाबेथ ब्राउनिंग, एलिझाबेथ गॅस्केल, शार्लट ब्रॉंटे व अन्य स्त्रीकादंबरीकारांनी या काळात आपल्या कादंब-यांतून स्त्रियांचे जीवन मोठया जिव्हाळ्याने रंगवले, त्यांचे प्रश्न अत्यंत पोटतिडिकेने मांडले. स्त्रीसंवेदनांची अत्यंत विश्वसनीय नोंद करून स्त्रीजीवनाच्या विविध बाजूंकडे संवेदनाशील पुरुषांचे लक्ष वेधले. हे करीत असताना त्यांनी स्त्री व पुरुष यांत विरोध आहे असे मानले नाही. तत्कालीन उदारमतवादी, मानवतावादी, समन्वयतावादी विचारांचा त्यांनी आधार घेतला यात त्यांची कोणतीही चूक झाली नाही असे आपण म्हणू शकतो.

अठराशे ऐंशी ते एकोणीसशे वीस हा युरोपातील स्त्रीमुक्तीचळवळीचा दुसरा कालखंड मानण्यात येतो. या काळात स्त्रीमुक्ती चळवळीने पितृसत्ताक पद्धतीत असलेल्या स्त्रीच्या सामाजिक स्थानासंबंधीच्या मोजदंडांना आव्हान दिले. आत्मविश्वासाने व कोणतीही शंका न बाळगता स्त्रीच्या स्वायत्ततेचा आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्री हक्कांचा आग्रहीपणाने घोष केला. स्त्रीमुक्ती चळवळीच्या क्रांतिकारी पवित्र्यामुळे पुरुषश्रेष्ठत्वाच्या कल्पनेला कायमचा तडा गेला. स्त्री किंवा पुरुष म्हणून जन्माला आल्याने कोणाचेही सामाजिक श्रेष्ठत्व व दर्जा प्रस्थापित होत नाही ही गोष्ट सिद्ध झाली. ऑलिव श्रायनर, सारा ग्रँड, श्रीमती क्रेगी, मेरी कोलरिज, जॉर्ज इजरटन इत्यादी स्त्रीलेखिकांनी आपल्या क्रांतिकारी लिखाणाने स्त्रीमुक्ती चळवळीच्या या दुस-या टप्प्याला निश्चित क्रांतिकारी वळण दिले.

1920 मध्ये युरोपात स्त्रीमुक्ती चळवळीचा तिसरा टप्पा सुरु झाला व आजवर तो चालू आहे असे मानण्यात येते. या कालखंडात स्त्रियांनी आत्मशोधाचा कसून प्रयत्न केला व स्वतःच्या अस्तित्वाचा अस्मितेचा शोध घेतला आपले स्त्री म्हणून असलेले अस्तित्व साकारण्याच्या त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच स्त्रियांना त्यांची आजची सामाजिक प्रतिष्ठा व दर्जा लाभला आहे.

या प्रदीर्घ कालखंडाचे तीन उपकालखंडात विभाजन करणे शक्य आहे. 1920 ते 1968 हा पहिला कालखंड. या उपकालखंडात आधीच्या कालखंडातील स्त्रीमुक्तीचळवळीतील तत्वे अधिक प्रकर्षाने पुढे आणण्याबरोबरच स्त्रीच्या अस्तित्वाचीही तात्विक शोध घेतला गेला. सिमॉन द् बोव्हार सारखी फ्रेंच कादंबरीकार या उपकालखंडातील स्त्रीमुक्तीचळवळीची प्रतिनिधी आहे असे म्हणता येते.

1968 मध्ये युरोप व अमेरिकेत सा-या प्रस्थापित समाजरचनेविरुद्ध विद्यार्थ्यांचे बंड झाले. या बंडाचे नेतृत्व फ्रान्समध्ये सार्त्रसारख्या आधीच्या पिढीतील प्रसिद्ध व प्रस्थापित अशा तत्वज्ञ लेखकाने केले. परंतु या बंडखोरीला तात्विक अधिष्ठान देण्याचे श्रेय 'वन डायमेन्शनल मॅन' या पुस्तकाच्या हर्बर्ट मार्क्यूज या लेखकाला देता येते. प्रस्थापिताला नकार देणे हे युवापिढीचे प्रमुख कर्तव्य आहे अशी तात्विक बैठक विद्यार्थी चळवळीला मार्क्यूजच्या विचारांमुळे मिळाली. मार्क्सवादी विचारविश्वातही युरो-कम्युनिझमची उदारमतवादी चळवळ सुरु झाली. या विद्यार्थी बंडात ज्या विद्यार्थिनी सामिल झाल्या होत्या त्यांची मानसिक व वैचारिक घडण वेगळया प्रकारे झाली व त्यांनी स्त्रीमुक्ती चळवळीला वेगळयाच दिशेने नेले. केट मिले, शुलामिथ फायरस्टोन, ज्युलिएट मिशेल यासारख्या बंडखोर स्त्री विचारवंतांनी स्त्रीवरील अत्याचाराचे मूळ समाजाने निर्मिलेल्या (निसर्गाने नव्हे) लिंगभेदविषयक विचारात आहे असे आग्रहाने व उदाहरणांसह दाखवून दिले. पुरुष लेखकांनी निर्मिलेल्या स्त्री प्रतिमेवर त्यांनी जोरदार हल्ला केला. स्त्रीजीवनाचे पुरुषांनी केलेले चित्रण व मूल्यमापन अन्याय आहे असे प्रतिपादन करून अहंकारी पुरुष लेखकांना बचावाची भूमिका त्यांनी घ्यायला लावली. एकूणच स्त्रीच्या समाजातील प्रतिमेसंबंधीचे त्यांचे कार्य क्रांतिकारक स्वरुपाचे होते यात शंका नाही.

अलीकडील आठ-दहा वर्षात स्त्रीमुक्ती चळवळीने फार वेगळे व अधिक क्रांतिकारी स्वरुपाचे वळण घेतले असल्याने स्त्रीमुक्ती चळवळीच्या तिस-या कालखंडातील हा तिसरा उपकालखंड आहे असे मानता येईल. आद्रिएन रिच, सुझन ग्रिफिन व नॅन्सी चोडोरॉवसारख्या स्त्रीमुक्ती चळवळीतील पुढा-यांनी असे मांडले आहे की स्त्रियांनी स्त्री म्हणून जन्माला आल्याबद्दल खेद न मानता अभिमान बाळगावा. स्त्री म्हणून जन्माला येणे हे दुबळेपणाचे लक्षण नसून सामर्थ्याचेच लक्षण आहे असे सांगून निसर्गनिर्मित लिंगभेदामुळे स्त्रीवर अन्याय होतो हे त्या अमान्य करतात. समाजातील समकालीन परिस्थितीच स्त्रीची कल्पना वा प्रतिमा घडवीत असते, दैव वा जन्म यामुळे ती कल्पना निर्माण होत नाही हे मांडून त्रियांना या लेखिका स्त्रियांना अभिमान बाळगण्याचा संदेश देतात. आपले स्त्रीत्व लपवू नका, याबद्दल दुःख वा कमीपणाची भावना बाळगू नका असे आग्रहाने सांगून पुरुषांपेक्षा स्त्रिया श्रेष्ठ आहेत अशी भूमिका त्या घेतात.

एकोणीसाव्या शतकात युरोपातदेखील अबला म्हणून गणल्या जाणा-या स्त्रीला सबला या प्रतिमेपर्यंत आणण्याचे कार्य स्त्रीमुक्ती चळवळीने केले आहे ही फार मोठी वैचारिक

व सामाजिक क्रांती आहे यात शंका नाही.

:3:

आचार-विचारांच्या वाढत्या देवाणघेवाणीच्या या विसाव्या शतकात युरोप-अमेरिकेतील वैचारिक सामाजिक क्रांतीचा भारतीय जन-मानसावर परिणाम होणे स्वाभाविक होते. विशेषतः सुशिक्षित व जागृत स्त्रियांवर त्याचा स्वाभाविक परिणाम झाला. भारतात देखील एकोणीसाव्या व विसाव्या शतकात जागृत भारतीय स्त्रियांनी व काही उदारमतवादी पुरुषांनी स्त्रीमुक्ती चळवळीला पुढे नेण्याचे महान कार्य केले आहे.

पाश्चात्य व भारतीय स्त्रीमुक्तीचळवळीचा एकोणीसाव्या शतकात व या शतकात निकटचा संबंध होता हे आपण पाहिले. समकालीन भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीचा व तीमधून निर्माण होणाऱ्या काही प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी स्त्रीसंबंधीचे, तिच्या सामाजिक स्थानासंबंधीचे भारतीय इतिकासात कोणते मत प्रचलित होते हे पहाणे आवश्यक आहे. मनुस्मृतिकारांनी स्त्रीला स्वातंत्र्य नाकारले व तिला दुय्यम दर्जाचा सामाजिक दर्जा दिला ही गोष्ट सर्वज्ञान आहे. मनुस्मृतिकारांसंबंधीची नाराजी दलित व स्त्रिया हे भारतीय समाजातील प्रमुख घटक नेहमीच व्यक्त करीत आले आहेत हेही सर्वज्ञात आहे. तसेच स्त्रीला देवता मानणारे भारतीय मतही लोकांना माहीत आहे. याशिवाय तांत्रिकांची विकृत स्वरूपाची स्त्रीपूजाही अनेकांना माहीत आहे. या तीन मतांखेरीज सांख्य तत्वज्ञांनी पुरुष व प्रकृतीचे अद्वैत मानले. पुरूषाला साक्षिस्वरूप ज्ञाता, अलिप्त, अकर्ता, अभाकता, तटस्थ, नित्य, अविकारी, स्वयंप्रकाशी मानले. (सांख्यांचा पुरुष या संकल्पनेचा अर्थ मानवी नर असा नव्हता, तर पुरुष म्हणजे पुरुषतत्व असे त्यांनी मानले. त्याचा अर्थही त्यांनी स्पष्ट केला आहे.) प्रकृतीला त्यांनी स्त्रीतत्व मानले व ती विकारी, गुणमयी, कार्यप्रवण, जड असून ज्ञाता अशा पुरुषाच्या जाणिवेचा ती विषय आहे असे मानले. प्रकृती व स्त्री या दोन्ही गोष्टी पुरुषतत्वाच्या पूरक असून त्यांचे स्थान दुय्यम नाही हेच सांख्यांना अभिप्रेत होते. शक्तिसंप्रदाय तर काली, दुर्गा, शक्ती, लक्ष्मी, सरस्वती ही विविध रूपे मानून स्त्रीतत्वाची पूजा करीत होता.

ही स्थिती हळूहळू पुराणकाळात व मध्ययुगात बदलत गेली. पुरुषाच्या मोक्षप्राप्तीच्या मार्गात स्त्रीही धोंड आहे असे मानले जाऊ लागले. स्त्री ही स्त्री असताना मोक्ष मिळवू शकत नाही. पुरुष म्हणून जन्माला येऊन पुण्यकृत्य केल्यावरच ती मोक्षाला पात्र होते असे मानण्यात येऊ लागले. कदाचित बाह्य आक्रमणांच्या धक्क्यामुळे भारतीय समाजाने स्त्रीला असे दुय्यम स्थान दिले असणेही शक्य आहे. कारण कोणतेही असो, परंतु तेरावे ते एकोणीसावे शतक या सुमारे सात-आठशे वर्षांच्या कालखंडात भारतीय समाजात स्त्रीला दुय्यम स्वरूपाचे स्थान दिले गेले ही गोष्ट सत्य आहे. अर्थात याच कालखंडात युरोपचीही गोष्ट विशेष वेगळी नव्हती हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे.

एकोणीसाव्या शतकात मात्र नवीन विद्या आत्मसात केलेल्या राजा राममोहन रॉय, पंडिता रमाबाई, महात्मा फुले, महर्षी अण्णासाहेब कर्वे यासारख्या स्त्रीहितकर्त्या मानावतावाद्यांनी युरोपातील मानवतावादी चळवळीपासून स्फूर्ती घेऊन स्त्रीहिताचा विचार मांडणे सुरू केले. त्यांनी स्त्रीशिक्षण व स्त्रीसुधारणेच्या चळवळी सुरु केल्या.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महात्मा गांधींनी स्त्रियांना सहभागी करून घेतले तेव्हाच स्त्री ही भारतीय जीवनातील मोठी शक्ती आहे याचा साक्षात्कार भारतीय मनाला झाला. स्त्रीपुरूष समानतेची कल्पना हळूहळू का होईना परंतु सुशिक्षित भारतीयांच्या मनात रूजू लागली. साऱ्या समाजाने आजदेखील या जाणीवेचा स्वीकार केलेला नसला तरी हळूहळू बऱ्याच लोकांना स्त्रियांचे प्रश्न जाणवू लागले आहेत हे दिसू लागले आहे.

अन्य प्राचीन समाजांप्रमाणे भारतीय समाजाचीही मूळ रचना स्वामित्वप्रधान आहे. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीतील कुटुंबप्रमुख पुरूषाला कुटुंबामध्ये अनिर्बंध सत्ता मिळून अन्य व्यक्तींना दुय्यम स्थान मिळत असते. याचबरोबर उच्चनीच जातिवर्ग कल्पनांमुळेही कुटुंबातील विविध घटकांचे स्थान वा महत्वही ठरत असते. या विविध गोष्टींचा परिणाम म्हणून स्त्रीचे दुय्यम स्थान आजदेखील सहज वा स्वाभाविक म्हणून समजले जाते. स्वतःच्या पत्नीला, बहिणीला, मुलीला, सुनेला धाकात ठेऊ शकणाऱ्या पुरूषाकडे सर्वसामान्य समाज आदरमिश्रित कुतुहलाने पहात असतो. अशा समाजाचे मन वळवणे, त्याच्या दृष्टिकोणात बदल घडवून आणणे फार अवघड आहे. उच्चवर्णीय व उच्च-वर्गीयांनी कनिष्ठ वर्गीय व कनिष्ठ वर्णियांवर सत्ता गाजवणे, पुरूषांनी स्त्रियांवर सत्ता गाजवणे आपल्या देशात सर्वसामान्य न्यायाचा प्रकार मानला जातो.

या समाजातील मनोभूमिका बदलण्यासाठी फार मोठया संदर्भात चळवळ होणे आवश्यक आहे. स्त्रीमुक्तीचळवळीने म्हणूनच अन्य पुरोगामी चळवळींबरोबर सहकार्य करणे, त्यांच्याबरोबरीने वाटचाल करणे आवश्यक आहे. 1968 च्या युरोप-अमेरिकेतील विद्यार्थी बंडाच्यावेळी साऱ्या पुरोगामी चळवळीत सहकार्य असण्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवली. भारतात ही जाणीव या दशकातच झाली आहे. भारतातही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी प्रांतात व भारतातल्या महानगरातच ही जाणीव प्रकर्षाने झालेली आढळते. या दशकातील स्त्रीमुक्तीचळवळीसंबंधी काही विचार मांडणे, थोडी चिंता व्यक्त करणे म्हणूनच युक्त ठरते.

स्त्रीमुक्तीचळवळीचा विचार, त्याची ऐतिहासीक पार्श्वभूमी आपण पाहिली. त्या चळवळीच्या काही प्रमुख छटांचा आपण विचार केला. सामाजिक-आर्थिक बदलांचा अटळ परिणाम म्हणून ही चळवळ पुढे वाटचाल करीत आहे हेही आपण पाहिले. आधुनिक शिक्षण व विविध व्यवसायात स्त्रियांनी मिळविलेले कौशल्य, स्थान, यश यामुळेच आजची आधुनिक स्त्री स्त्रीमुक्ती-सारख्या क्रांतिकारी विचाराचा आश्रय घेऊ शकते हेही आपण पाहिले. आधुनिक स्त्रीने न्यूनगंड सोडून दिला असून समाजाच्याही दृष्टिकोणात हळूहळू का होईना परंतु स्वागतार्ह असा बदल होत आहे.

स्त्रीमुक्ती चळवळीतील स्त्रियांना आणखी एक जाणीव प्रकर्षाने होत आहे. स्त्रीच्या सामाजिक स्थानाचा प्रश्न केवळ मानवतावादी भूमिकेतून न बघता स्त्रीच्या अस्मितेच्या दृष्टिकोणातून त्या प्रश्नाकडे पहाणे आवश्यक आहे अशी जाणीव त्यांना होऊ लागली आहे. यातूनच काही स्त्रियांनी अधिक आग्रही व आक्रमक स्वरूपाची भूमिका घ्यायलाही सुरूवात केली आहे. समाजातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाबद्दल समाजाची पुरुषप्रधान रचना मूलतः कारणीभूत आहे ह्या विचाराशी न थांबता त्यांनी पुरुषविरोधी भूमिकेचा पुरस्कार सुरू केला आहे. स्त्रीला दैवताचे स्थान देण्याचा प्रकारही सुरु झाला असून एक प्रकारचे स्त्रीपूजन सुरू करण्यात आले आहे. या चिंताजनक प्रकाराबद्दल लिहिताना रोझमेरी जॅक्सन लिहिते, "एखाद्या लोकप्रिय गोष्टीचा अतिरेक करण्याचा हा प्रकार आहे. वर्तमानपत्रे, पुस्तके, अशासारख्या प्रसिद्धी माध्यमातून स्त्रियांनी प्राप्त केलेल्या यशाला देवी वा अतिमानुषी रूप देण्यात येत असून स्त्रीपूजनाचा प्रकार सुरू झाला आहे." (एनकाउंटर, जुलै 1977, पा. 76)

अशा अतिरेकी पाश्चात्य स्त्रीमुक्तीचळवळीचे अंधानुकरण करून कुटुंबसंस्था ही स्त्रीची बेडी आहे असे भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील काही पुढारी महिला सांगू लागल्या आहेत. मानवी जीवन काही प्राणिशास्त्रीय व समाजशास्त्रीय नियमांनी बद्ध आहे व वंशसातत्य, वंशवृद्धी, वंशप्रगतीसाठी स्त्री व पुरुषांचे कुटुंबसंस्थेसारख्या संस्थेतील सहअस्तित्व आवश्यक आहे हे महत्वाचे सत्य नाकारण्याची अतिरेकी भूमिकाही काही अतिपुरोगामी महिलांकडून घेतली जात आहे. माता व पत्नी ही दोन स्त्रीरूपे मानवी समाजरचनेचेच आधार असून स्त्रियांवर या भूमिका सक्तीने लादलेल्या नसून त्यांमध्ये एक स्वाभाविकता आहे हे नाकारणारी स्त्रीमुक्तीचळवळीची अतिपुरोगामी शाखा समाजविघटनाची भूमिकाच घेत आहे. पाश्चात्य देशात हे अधिक आग्रहीपणाने केले जात आहे. आपल्याकडे असा विघटनवादी सूर ब-याच अंशी एकाकीपणे लावण्यात येतो.

यात दशकात पाश्चात्य देशात स्त्रीमुक्तीचळवळीत


*DIWALI GREETINGS FROM :*

*DIWALI GREETINGS FROM :*

VAIBHAV TRANSPORT

FOR URGENT & QUICK DELIVERY
WITH PROPER CARE
PLEASE CONTACT

D. N. Nagar, Bldg. No. 43/1707.
Andheri (West), BOMBAY - 400058.
Phone : 620600.

*With Best Compliments from :*

SACHIN DECORATORS
( BUILDING CONTRACTOR )

Santokh Mansion No. 2,
IInd Floor, Room No. 34-35,
272, Barister Nath Pai Marg,
Mazgaon, BOMBAY-400 010.
Phone : 8511772.

असणा-यांनाच स्त्रीमुक्तीचळवळीच्या दुस-या बाजूची ओळख पटू लागली आहे. व्यावसायिक यशामागे बेगुमानपणे धावून व पुरुषविरोधी भूमिका घेऊन स्त्रियांचे प्रश्न सुटू शकणार नाहीत याची जाणीव अनेक पुरोगामी स्त्रियांना झाली आहे. स्त्रीमुक्तीच्या क्रांतिकारी रुपामागे लागल्याने मातृत्व, घर, कुटुंब या गोष्टी काही स्त्रियांना जरी त्याज्य वाटत असल्या तरी बहुसंख्य स्त्रियांना तसंच स्त्रीमुक्तीचळवळीतील बहुसंख्य स्त्रियांनाही या गोष्टी श्रेयस्करच वाटत राहिल्या आहेत. म्हणूनच नोकरी करणा-या महिलांना नोकरी व घर सांभाळण्याची दुहेरी कसरत करावी लागत आहे. ज्या बंडखोर स्त्रियांनी मातृत्व, घर व कुटुंब यांना श्रेय न मानता व्यावसायिक यशाचा ध्यास घेतला, त्यापैकी ब-याच स्त्रियांना अविवाहित रहावे लागले. व्यावसायिक जीवनातील जीवघेण्या स्पर्धेतही त्यांना मनासारखे यश न मिळाल्याने निराशाजनक अनुभव आले. याच संदर्भात स्त्रियांना यश व समाधानाची जाणीव व भावना नेमकी कशामुळे मिळते याची चर्चाही पाश्चात्य स्त्रीमुक्ती चळवळीमध्ये सुरु झाली. आनुवंशिकी विज्ञानाचे दाखले देण्यात येऊ लागले. पुरुषविरोधी पवित्रा घेणारी स्त्रीमुक्तीचळवळीची विचारधारा पाश्चात्य स्त्रियांनाच काही प्रमाणत पटेनाशी झाली. पुरुषविरोधी पवित्र्या-वरील पहिला अतिरेकी विश्वास कमी झाला.

पाश्चात्य देशातील स्त्रीमुक्ती चळवळ अशा भोव-यात सापडली असताना भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील कार्यकर्त्यांनी, त्यांचे अंधानुकरण न करता भारतीय समाजवास्तवाचा भारतीय चष्म्यातून अभ्यास करुन स्वतःचे उपाय शोधणे, मार्ग शोधणे योग्य होईल. बव्हंशी उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांकडे या चळवळीचे नेतृत्व आहे. यात बदल होणे आवश्यक आहे. पाश्चात्य चष्म्या-तून भारतीय समाज व भारतीय स्त्रीजीवनाचे दर्शन घेणारे हे उच्चभ्रू वर्गातील नेतृत्व भारतीय वास्तवाचे योग्य विश्लेषण करु शकणार नाही. भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना सापडणार नाहीत. भारतीय स्त्रीच्या दुःखावरील उपायही त्यांना सापडणार नाहीत. खेडयापाडयातील स्त्रिया, तसेच शहरातील खेडेसदृश उपसंस्कृतीत रहाणा-या स्त्रियांना गरीबी, जातिभेद, अज्ञान, शोषण, अवहेलना यांचे जे चटके बसत असतात त्यांची तीव्रता त्या वर्गातून वर आलेल्या स्त्रियांनाच होऊ शकेल. दलित वर्गाला जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आपले असे नेतृत्व मिळाले तसेच या उपेक्षित स्त्रीला स्वतःचे असे नेतृत्व मिळणे आवश्यक आहे. त्यातूनच खरीखुरी सामाजिक क्रांती घडून येऊ शकेल. पश्चिम युरोप व अमेरिकेतील मार्ग-दर्शनावर व साधनांवर अवलंबून रहाणारे उच्चभ्रू नेतृत्व भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीला पुढे नेऊ शकणार नाही.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, पंडिता रमाबाई रानडे, महर्षी कर्वे यांच्यासारख्या त्यागी व निःस्वार्थी स्त्रीहितकर्त्यांचे विचार व कृती यांचा मागोवा घेऊनच भारतीय स्त्री जीवनाचे सत्यदर्शन होऊ शकेल. स्त्रियांच्या प्रश्नांवर योग्य उपाययोजना सुचू शकेल. मानवतावादी विचारदर्शन, तसेच समग्र मानवी जीवनाचा विचार करणारे मार्क्सवादी जीवनदर्शनही भारतीय स्त्री-मुक्ती-चळवळीला मार्गदर्शक ठरु शकतील. अशा स्वरुपाच्या प्रेरणाच भारतातील स्त्रीमुक्तीचळवळीचे भारतीयीकरण करु शकतील. आज काही प्रमाणात स्त्रीमुक्ती चळवळीच्या भारतीयीकरणाची ही प्रक्रिया सुरु झाली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. हुंडाविरोधी चळवळ, स्त्रीमजुरांना समानवेतन देण्याची चळवळ या गोष्टी भारतीयीकरणाच्या निदर्शक आहेत. पाश्चात्य स्त्रीमुक्ती चळवळी-कडे दूरचा दिवा दाखवणारी चळवळ म्हणून पहाणेच रास्त आहे. आपला रस्ता आपण शोधला पाहिजे याची जाणीव स्त्रीमुक्ती-चळवळीत आल्यावर पुरुषविरोधी भूमिका घेतली न जाता स्त्री--पुरुषांच्या सहअस्तित्वाचा आपल्या संदर्भात शोध घेणे शक्य होईल. भारतीय जीवनाशी सुसंगत असणारे स्त्री-पुरुष संबंधांचे, मानवी जीवनाचे सर्वंकष तत्वज्ञान अशाच चळवळीतून उभे राहू शकेल. □

